# अस्सल साधेपणामुळे दुर्लक्षित राहिलेले बासूदा

***अमोल पालेकर***

अभिनेता व दिग्दर्शक
palekaramol11@gmail.com

अनुवाद : आनंद थत्ते
thatte.anand7@gmail.com

Sambhāṣaṇ Volume 1 : Issue 03, July 2020 | **संभाषण** वर्ष ०१: अंक ०३, जुलै २०२०

(बासू चटर्जी यांचं गेल्याच महिन्यात दि. ४ जून रोजी निधन झालं. बासू चटर्जी यांच्याबरोबर सहा सिनेमात काम केलेले आणि *रजनीगंधा* या सिनेमात प्रमुख भूमिका करणारे अमोल पालेकर सांगत आहेत त्यांच्या संबंधांविषयी आणि त्यांचं काम अजरामर का झालं याविषयी.)

“तुला तुझे नाव बदलायचे आहे का अमोल? म्हणजे अनमोल कुमार वगैरे?” बासूदांनी (बासू चटर्जी) मला *रजनीगंधा* (१९७४) रिलीजसाठी तयार झाला तेव्हा विचारलं होतं. ते त्यांची फिल्म अनेक वितरकांना दाखवत होते आणि सगळी नावं नवीन असल्यामुळे वितरक कुठलाही धोका पत्करायला तयार नव्हते. आतापर्यंतची इंडस्ट्रीमधील प्रसिद्ध महाराष्ट्रीयन नावं म्हणजे व्ही. शांताराम, सी. रामचंद्र आणि मास्टर भगवान ही होती. कपूर, कुमार वगैरेंसारख्या उत्तर भारतीय नावांच्यामध्ये आपलं नाव कुठं कमी पडायला नको म्हणून त्यांना कदाचित आपली नावं बदलावीशी वाटली असावीत – व्हणकुद्रे, चितळकर आणि भगवान आबाजी पालव अशी त्यांची मूळ नावं होती.

मी नाव बदलायला साफ नकार दिला. पण याचे बासूदांना फारसे आश्चर्य वाटले नाही. बासूदा जेव्हा पिया का घरबद्दल विचारायला माझ्याकडे १९७२मध्ये आले होते, तेव्हाच माझ्या हट्टी स्वभावाची झलक त्यांनी अनुभवली होती. खरं तर, मला तो सिनेमा करायला आवडलं असतं. पण त्यांनी मला प्रथम निर्मात्याला भेट असं सांगितलं. एखाद्या निर्मात्यासमोर ‘मला भूमिका द्या’ म्हणून मी भिकेची झोळी घेऊन उभा आहे, असं माझं चित्र मलाच अस्वस्थ करून गेलं होतं म्हणून मी बडजात्यांना भेटायला नकार दिला आणि अर्थातच ती फिल्म मला मिळाली नव्हती.

माझ्या हट्टी स्वभावाची पूर्ण कल्पना असूनदेखील, त्यांनी मला एका वर्षानंतर *रजनीगंधा*साठी विचारलं. चित्रपटाची कथा ऐकायला मी खूप उत्सुक होतो. एक दिवस बासूदा कथा सांगू लागले. पहिल्या काही ओळींनंतर त्यांनी माझ्या हातात एक पुस्तक ठेवलं. त्यातली मन्नू भंडारी यांची लघुकथा वाच म्हणून सांगितलं. ती दीड-दोन पानं वाचून त्यातून सिनेमा कसा उभा राहणार याची मला काहीच कल्पना आली नाही. तरीही त्या कथेत एक साधेपणा होता, जो मला खूप भावला. मी अर्थातच होकार दिला.

माझ्याबरोबर काम करणारे दिनेश ठाकूर आणि विद्या सिन्हा हेदेखील माझ्याप्रमाणेच सिनेमाला नवखे होते. पण मला आणि दिनेशला निदान नाटकाची पार्श्वभूमी तरी होती. विद्याला तीही नव्हती. एखादा सीन कसा सादर करायचा हे काही त्यांनी कधीच सांगितलं नाही, त्यामुळे विद्याची तर फारच पंचाईत व्हायची. बासूदा मलाच आमच्या सीनची रिहर्सल घ्यायला सांगायचे. नंतरदेखील *चितचोर* सिनेमाच्यावेळी त्यांनी मला विजयेंद्र घाटगेसोबत हॉटेलात एकाच खोलीत ठेवले होते. कारण एकच, आमच्या सीनची रिहर्सल करून घेणे. शॉट ओके झाला की त्यांच्या ओठावर हलकेसे हसू यायचे. पाठीवर शाबासकीची थाप देण्याची ती त्यांची पद्धत होती. त्यांचं ते हसू दिसलं की,खूप छान वाटायचं.

माझ्यावर त्यांचे त्याआधीपासूनच प्रेम होते. मुंबईमध्ये फिल्म सोसायटीच्या माध्यमातून बासूदांनी माझी अनेक विदेशी सिनेमांशी ओळख करून दिली होती. त्यामुळे आम्ही एकत्र काम सुरू करण्याआधीच आमचं नातं जुळलं होतं. ते मोजकंच बोलायचे. ते त्यांच्या स्क्रिप्टवर सतत काम करत असायचे. त्यांचं व्यक्तिमत्त्व अजिबात फिल्मी नव्हतं.त्यांचं हे साधं असणं मला खूप आवडलं होतं. त्यांच्याबरोबर वादविवाद झाला, असा एकही प्रसंग मला आठवत नाही आणि याचं सर्व श्रेय अर्थातच त्यांना जातं.

बासूदांबरोबर मी सहा सिनेमे केले आणि हृषीदांबरोबर पाच. दोघांबद्दल माझ्या मनात सारखाच प्रेमादर आहे. त्या दोघांचीही शैली मला खूप आवडते. खूप चिरफाड केल्यानंतर आता मागं वळून पाहताना मला असं वाटतं की हृषीदांबरोबर काम करायला मला जास्त आवडलं. कारण ते अतिशय प्रेमळ आणि उत्साही होते. हृषीदांच्या फिल्म्स अधिकाधिक परिपूर्ण आणि भावनाशील होत्या. तांत्रिकदृष्ट्या हृषीदांच्या फिल्म्स बासूदांपेक्षा जास्त सरस होत्या. मला असं वाटतं की, बासूदांची कथनशैली जास्त अस्सल असायची आणि त्यात सिनेमाचे ठरावीक हिशेब नसायचे. ते त्यांच्या पटकथेत अतिनाट्य येऊ द्यायचे नाहीत आणि नाट्यपूर्ण पेचप्रसंग, धक्के अशा गोष्टी टाळायचे. त्यांची सिनेमाशैली साधी होती पण सोपी नव्हती. विनोद निखळ होता. त्यांची पात्रं असुरक्षित भासली तरी सहसा चुकत नाहीत. त्यांचा एक नैतिक आलेख असतो पण ती कधीही निवाडा करत नाहीत.

माझ्यातल्या दिग्दर्शकाला बासूदांनी जास्त प्रभावित केलं आहे. चित्रीकरण स्टुडिओत न करता लोकेशनवर करण्याच्या त्यांच्या अट्टाहासाने मला खूप प्रभावित केलं आहे. इतकं की, मी माझ्या कुठल्याही सिनेमाचं शूटिंग स्टुडिओत केलेलं नाही. अपवाद फक्त *पहेली* (२००५) या चित्रपटातील काही भाग. प्रत्यक्ष चित्रीकरण सुरू करण्यापूर्वी संवादांसकट संपूर्ण स्क्रिप्ट तयार असलंच पाहिजे, ही शिस्त आणि हा गुण मी त्यांच्याकडूनच घेतला आहे. काही वर्षांपूर्वी झरिना वहाब, बिंदिया गोस्वामी आणि विद्या सिन्हा आम्ही एकत्र आलो आणि बासूदांना अचानकपणे भेटून आश्चर्याचा धक्का दिला होता. आम्हा सर्वांना एकत्रित भेटून त्यांना अत्यानंद झाला होता. त्यावेळी माझी पत्नी संध्या हिने आमच्या सर्वांचे फोटो काढले होते. ते खूप अशक्त दिसले तरी त्यांचा चमकदार आत्मा काही लपून राहिला नव्हता. त्यांच्या घराच्या पायऱ्या उतरत असताना एका उदास भावनेनं मला घेरून टाकलं. मला वाटलं त्यांच्या सदाबहार योगदानाला जेवढं श्रेय मिळायला हवं होतं तेवढं त्यांना फिल्म इंडस्ट्रीने दिलं नाही. 'पद्म' पुरस्कार मिळालेल्या स्वयंघोषित चमचमत्या माणसांच्या घोळक्यात बासूदा एकांडे पडलेले दिसतात, क्षितिजावर कोमेजून गेलेले दिसतात. हा आपल्या सर्वांचा एकत्रित पराभव आहे. पण त्यांचं काम अमर आहे. ते काही कोणी त्यांच्याकडून हिरावून घेऊ शकत नाही. जेव्हा एखादी नर्मविनोदी फिल्म अयशस्वी होते, तेव्हा बासूदांच्या सिनेमांचं मोठेपण जास्तच अधोरेखित होतं. बासूदा, तुम्ही आम्हाला सोडून गेल्यानंतर या ओळी माझ्या मनात रेंगाळताहेत -

एक '*बॉय नेक्स्ट डोअर*' तुम्हाला सलाम करतो.

~

***'Basuda Didn't Get His Due'*** by Shri Amol Palekar was originally published in THE INDIAN EXPRESS issue dated JUNE 7, 2020